# मराठी (आंतरभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 1 ली

### विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ)**

**(1)** **(i)** (1) पाटीचा फुटका तुकडा | फाटके पुस्तक

(2) पांढरेशुभ्र धोतर | नेहरू शर्ट

**(ii)** इयत्ता पहिली-दुसरीला कोणते गुरुजी शिकवत असत?

**(2)** लेखिका गरीब घरातल्या होत्या. पाटीचा फुटका तुकडा आणि फाटके पुस्तक घेऊन त्या शाळेत जात. त्या शाळेत उशिरा गेल्या की, वांदिले गुरुजी त्यांच्याकडे रागाने बघत. अशा परिस्थितीत कांबळे गुरुजींनी त्यांच्यावर खूप माया केली. त्यांच्या डोळ्यांत लेखिकेला माया दिसे. लेखिका शाळेत उशिरा पोहोचल्या तरी कांबळे गुरुजी रागवत नसत. गुरुजी त्यांना पाटीवर 'ग, म' लिहून देत. परत परत लिहायला सांगत. लेखिका जेवल्या की नाही, याचीही ते सहानुभूतीने चौकशी करीत. लेखिका ज्या थोड्याफार शिकल्या त्याचे श्रेय त्या कांबळे गुरुजींच्या उबदार मायेला देतात. त्यांच्या उजाड, वाळवंटासारख्या रखरखीत आयुष्यात कांबळे गुरुजी जणू सावली झाले होते, अशी आदरयुक्त भावना लेखिका कांबळे गुरुजींविषयी व्यक्त करतात.

**प्र. 1. (आ)**

**(1)** शहरात त्या दिवशी गर्दी होती; कारण तो आठवड्याच्या बाजाराचा दिवस होता.

**(2)** (i) सिसिली (ii) सिराक्सूस

**(3)**

| | |
|---|---|
| द्राक्षाच्या गासड्या | ऑलिव्ह फळाचे ढिगारे |
| हिरव्या पालेभाज्या | विकण्याचे इतर जिन्नस |

### विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) सद्गुरुंच्या मनातील भाव स्वतःच्या मनात धारण करावा, असा उपदेश संत शेख महंमद यांनी केला आहे.

(ii) **साधूचे मन या अर्थी आलेले दोन शब्द** → हृदय, अंतर

**(2)** नारळ वरून टणक असतो; पण आत कोमल, गोड खोबरे असते.

**प्र. 2. (आ)**

**(1)** **फुलपाखरांच्या पंखांची वैशिष्ट्ये** → सोनेरी, मखमली, रुपेरी, इंद्रधनुष्याचे रंग

**(2)** संध्याकाळची शोभा वर्णन करताना कवी म्हणतात – पिवळसर, लालसर व कोवळे ऊन चहुकडे पसरले आहे. वाहत्या पाण्यावर ऊन पडल्यामुळे असे वाटते की, ओढा जणू सोने लांब वाहून नेतो आहे.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ)**

**(1)** (i) भविष्यकाळ

(ii) मी विद्यापीठ गेटमधून गेलो.

**(2)** (i) हवाली करणे – सोपवणे

(ii) चंगळ उडणे – चैन होणे

**प्र. 3. (आ)**

**(1)** **(i)** (1) दिवस = दिन  (2) रात्र = निशा

**(ii)** उदाहरण ⟶ दार  रण

**(2)** संस्कृती

**(3)** (i) , ⟶ स्वल्पविराम  (ii) ! ⟶ उद्गारचिन्ह

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***